# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जाहीर सूचना

**घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ चे पालन करणे बाबत**

भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयामार्फत अधिसूचित करण्यात आलेले **घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६** (Solid Waste Management Rules २०२६) दिनांक **०१ एप्रिल २०२६** पासून लागू करण्यात आले असून शहरातील घनकचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य संवर्धन व स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, व्यापारी, व्यावसायिक आस्थापना, शासकीय व निमशासकीय संस्था, गृहनिर्माण संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, उद्योग व इतर सर्व घटकांनी सदर नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**१. कचऱ्याचे स्त्रोत स्तरावर वर्गीकरण**

प्रत्येक नागरिक, संस्था व आस्थापनांनी निर्माण होणारा कचरा खालीलप्रमाणे स्वतंत्रपणे वर्गीकृत करणे बंधनकारक आहे:

- ओला कचरा (Wet Waste)
- सुका कचरा (Dry Waste)
- सॅनिटरी कचरा (Sanitary Waste)
- विशेष काळजी कचरा (Special Care Waste)

अवर्गीकृत कचरा महानगरपालिकेकडे देणे अथवा सार्वजनिक ठिकाणी टाकणे नियमबाह्य राहील.

**२. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्यास व जाळण्यास बंदी**

खालील कृती नियमबाह्य असून दंडनीय आहेत :

- रस्ते, पदपथ, मोकळ्या जागा, नाले, नदीपात्र, जलाशय किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे.
- कचरा, पाला-पाचोळा, प्लास्टिक अथवा इतर कोणताही कचरा जाळणे.
- सार्वजनिक ठिकाणी कचरा साठवणे अथवा टाकून देणे.
- अवर्गीकृत कचरा महानगरपालिकेकडे सुपूर्द करणे.

**३. बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition - C&D) कचरा**

- बांधकाम, दुरुस्ती अथवा पाडकामातून निर्माण होणारा मलबा रस्त्यावर, मोकळ्या जागेत, नाल्यात अथवा नदीपात्रात टाकणे प्रतिबंधित आहे.
- सदर कचऱ्याची विल्हेवाट महानगरपालिकेने अधिकृत केलेल्या व्यवस्थेद्वारेच लावणे आवश्यक राहील.
- नियमभंग आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**४. बल्क वेस्ट जनरेटर्स (Bulk Waste Generators - BWG)**

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ नुसार खालीलपैकी कोणताही एक निकष पूर्ण करणारी संस्था, आस्थापना किंवा गृहनिर्माण संस्था ही बल्क वेस्ट जनरेटर (BWG) म्हणून गणली जाईल :

- २०,००० चौ.मी. किंवा अधिक बांधकाम क्षेत्र.
- ४०,००० लिटर प्रतिदिन किंवा अधिक पाणी वापर.
- १०० कि.ग्रॅ. प्रतिदिन किंवा अधिक घनकचरा निर्मिती.

यामध्ये शासकीय कार्यालये, खाजगी कंपन्या, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, नर्सिंग होम्स, मॉल्स, मल्टिप्लेक्स, औद्योगिक आस्थापना, बाजारपेठा, विवाह हॉल, स्टेडियम, क्रीडा संकुले, पर्यटन स्थळे, मोठ्या गृहनिर्माण संस्था व तत्सम आस्थापनांचा समावेश होतो.

**५. BWG नोंदणी व अनुपालन**

- सर्व पात्र BWG यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांच्या केंद्रीकृत पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**BWG Registration Portal: https://swm.cpcb.gov.in**

- सर्व पात्र BWG यांनी नाशिक महानगरपालिकेकडे स्वतंत्रपणे BWG म्हणून नोंदणी करणे आवश्यक राहील.
- सर्व BWG यांनी ओल्या कचऱ्याची जागेवर प्रक्रिया (Composting/Bio-methanation) करणे, कचऱ्याचे स्त्रोतस्तरावर वर्गीकरण करणे, पुनर्वापरयोग्य कचऱ्याचे स्वतंत्र व्यवस्थापन करणे व नियमांतील सर्व तरतुदींचे पालन करणे आवश्यक राहील.
- कोणत्याही स्वतंत्र नोटीसची प्रतीक्षा न करता सर्व पात्र BWG यांनी स्वतःहून नोंदणी पूर्ण करावी.

**६. दंडात्मक व कायदेशीर कारवाई**

• घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ मधील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक आस्थापना, गृहनिर्माण संस्था तसेच BWG यांच्याविरुद्ध नाशिक महानगरपालिकेचे प्रचलित उपविधी, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ तसेच लागू कायद्यांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

• नियमभंग करणाऱ्यांकडून पर्यावरणीय नुकसान भरपाई (Environmental Compensation), दंड व इतर लागू शुल्क वसूल करण्यात येतील.

• पात्र BWG यांनी नोंदणी न केल्यास, कचरा वर्गीकरण न केल्यास, ओल्या कचऱ्याची प्रक्रिया न केल्यास अथवा नियमांचे पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

• आवश्यकतेनुसार संबंधित आस्थापनांविरुद्ध कारणे दाखवा नोटीस, परवाना/अनुज्ञप्ती संदर्भातील कार्यवाही तसेच इतर वैधानिक कारवाई करण्यात येईल.

• पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम १५ नुसार गंभीर अथवा सातत्यपूर्ण उल्लंघनाच्या प्रकरणांमध्ये पाच वर्षांपर्यंत कारावास किंवा रुपये एक लाखांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. उल्लंघन सुरू राहिल्यास अतिरिक्त दंड आकारण्यात येऊ शकतो तसेच पुढील फौजदारी कारवाई करण्यात येईल.

**७. नागरिकांना आवाहन**

• कचरा वर्गीकरण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.
• सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये व कचरा जाळू नये.
• बांधकामाचा मलबा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये.
• सर्व पात्र BWG यांनी तात्काळ नोंदणी करून नियमांचे पालन करावे.
• स्वच्छ, सुंदर, हरित व शाश्वत नाशिक शहराच्या निर्मितीसाठी नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांना खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.**

| अ.क्र. | कृती/बाब | दंड र. रु. |
|---|---|---|
| १ | पालापाचोळा, प्लास्टिक, सर्व प्रकारचा कचरा, रबर इ. जाळणे | ५,०००/- |
| २ | सर्व प्रकारचा कचरा जाळणे (मोठ्या प्रमाणात) | २५,०००/- |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे | १०,०००/- |
| ४ | सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मैला टाकणे | ५,०००/- |
| ५ | रस्ता/मार्गावर घाण करणे | १८०/- |
| ६ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १५०/- |
| ७ | उघड्यावर लघवी/ लघुशंका करणे | २००/- |
| ८ | उघड्यावर शौच करणे | ५००/- |
| ९ | विलगीकरण न केलेला व वेगळ्या डब्यामध्ये साठवण न केलेला कचरा सोपविल्या बद्दल | |
| | **अ) घरगुती/व्यावसायिक आस्थापना** | |
| | १) पहिला प्रसंग | ३००/- |
| | २) नंतरचा प्रत्येक प्रसंगी | ५००/- |
| | **ब) मोठ्या प्रमाणातील कचरा निर्माण करणारे जनक** | |
| | १) पहिला प्रसंग | ५,०००/- |
| | २) नंतरचा प्रत्येक प्रसंगी | १५,०००/- |
| १० | **नागरिक महानगरपालिका कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनास/थुंकण्यास व धुम्रपानास (ई-सिगरेट सह ) प्रतिबंध करणे** | |
| | अ) पहिला गुन्हा (दंड व १ दिवस सार्वजनिक सेवा) | १,०००/- |
| | ब) दुसरा गुन्हा (दंड व ३ दिवस सार्वजनिक सेवा) | ३,०००/- |
| | क) तिसरा गुन्हा व त्यानंतर (दंड व ५ दिवस सार्वजनिक सेवा) | ५,०००/- |

**प्रतिबंधित एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकच्या वापर बाबत चा दंड :-**

| अ.क्र. | गुन्ह्याचे स्वरूप | दंडाची रक्कम व स्वरूप |
|---|---|---|
| १ | पहिला गुन्हा | ५,०००/- |
| २ | दुसरा गुन्हा | १०,०००/- |
| ३ | तिसरा गुन्हा | २५,०००/- व तीन महिने कारावास |

**बांधकाम/ पाडकाम कचरा (C&D Waste) :-**

| अ.क्र. | गुन्ह्याचे स्वरूप | रक्कम |
|---|---|---|
| १ | मनपा परिसरात बांधकाम राडारोडा कचरा निर्मितीदाराकडून बांधकाम राडारोडा कचरा उचलणे व व वाहतुकीसाठी आकारण्यात येणारे शुल्क | ८००/- रुपये प्रति टन |
| २ | अनधिकृत बांधकाम राडारोडा कचरा नैसर्गिक नदी, नाले, ओढे, तलाव इत्यादी जलस्त्रोतांच्या बाजूने किंवा रस्ता, पदपथ किंवा मोकळ्या खाजगी, शासकीय जागेवर टाकल्याचे आढळल्यास करण्यात येणार दंड | संबंधित राडारोड्याच्या प्रमाणानुसार वाहतुकीची येणाऱ्या खर्चाच्या दहापट रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात येईल त्याचप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |

(मनिषा खत्री, भा.प्र.से)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक